# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३८–२०१०/ दिनांक :

सौं. इंदुबाई पोपट माळी,
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत , जि. सांगली

— विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. इंदुबाई पोपट माळी, मु.पो. जत,,ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे घरगुती वीज कनेक्शना मिळावे यासाठी दि. ४.७.२००९ ला अर्ज केला व त्यासाठी आवश्यक ती फी भरली. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दि. २९.४.२०१० रोजी दाखल केली. वि.प.ने त्याना मुदतीत चलन दिले नाही म्हणून मंचाकडे अनुसूची अ मध्ये दि. १५.२.२०१० ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये वीज कनेक्शन मिळावे व विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १५.४.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. ४.७.२००९ रोजी चलनाचे पैंसे भरल्याचे मान्य केले. त्यांनी चाचणी अहवाल दि. ५.४.२०१० रोजी दिला व दिनांक ७.४.२०१० रोजी त्यांना कनेक्शन देण्यात आले.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. ५.४.२०१० रोजी मंचासमोर ठेवली असता, तक्रारदार गैंरहजर. वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी उपस्थित. वि.प.तर्फे विलंब झाल्याचे मान्य केले आहे, परंतु चाचणी अहवाल देताच २ दिवसांत कनेक्शन देण्यात आले आहे असे सांगितले. आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी मंचाला अग्रेषित केलेला तक्रारदाराचा अर्ज हजर केला. त्यात वि.प.तर्फे ३ पोलची लाईन तयार करुन दि. ७.४.२०१० ला कनेक्शन मिळाल्याचे मान्य केले आहे व तक्रार रद्द करण्यात यावी असे म्हटले आहे.

या वरुन हे स्पष्ट होते की, तक्रारीतील एक मागणी म्हणजे वीज कनेक्शन मिळावे ही पूर्ण झाली आहे, विलंबाबाबत भरपाईचा हक्क सोडून दिल्याचे तक्रारदाराच्या दि. ७.४.२०१० च्या अर्जावरुन दिसते. त्यामुळे तक्रारदाराचे पूर्ण समाधान झाले आहे, त्यांची वि.प.ने कनेक्शनच्या मागणीची पूर्तता केली असलेने तक्रारदाराचे तक्रार रद्द करावी म्हणजे निकाली काढावी हे म्हणणे ग्राह्य धरुन तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराचे दि. ७.४.२०१० च्या अर्जानुसार त्यांना वि.प.तर्फे वीज जोडणी देण्यात आलेली असल्याने भरपाईचा हक्क सोडून दिला आहे व तक्रार रद्द करावी अशी विनंती तक्रारदाराने केल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :